कला अकादमी गोवा

पणजी–गोवा

कअ/काविवि/म.रं.दि/२०२४–२५/१६३८

दि. ३०/१०/२०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीतर्फे मंगळवार दि. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायं ७.०० वाजता मराठी रंगभूमी दिन साजरा करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री व कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. गोविंद गावडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे.

याप्रसंगी अभिनय कल्याण निर्मित **"कृष्णविवर"** हे नाटक सादर करण्यात येणार असून दत्ता पाटील यांच्या लेखणीतून साकार झालेली ही नाटयकृर्ती अभिजीत झुंजारराव यांनी दिग्दर्शित केली आहे. तसेच नेपथ्याची बाजुही त्यानीच सांभाळली आहे. प्रकाश योजना श्याम चव्हाण यांची असून ओमकार जाधव यांचे संगीत लाभले आहे. तर रंगभुषा व वेषभुषा तृप्ती झुंजारराव यांची असेल. या नाटकातील भुमिका मनाली राजेश्री व योगेश खांडेकर या प्रज्ञावंत कलाकारांनी साकारल्या आहेत. मुंबई व आजुबाजूच्या ठिकाणी या नाटकाचे प्रयोग झाले असून चोखंदळ नाटयरसिकांच्या पसंतीस हे नाटक उतरले आहे.

नाटयप्रयोगास प्रवेश विनामुल्य असून दर्जेदार प्रायोगिक मुल्ये असलेला हा अनोखा नाटयप्रयोग अनुभवण्याची संधी या प्रयोगाव्दारे रसिकांना लाभणार आहे. तरी सर्व नाटयप्रेमी रसिकांनी आवर्जून उपस्थित राहून या नाटयकृतीचा आस्वाद घ्यावा असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः–फोटो

प्रति१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)